**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - रंजन सदानंद कोळंबकर
वय - ३४ वर्षे
व्यवसाय - मोलमजुरी
रा/ने - वायरी भुतनाथ, ता. मालवण जि. सिंधुदूर्ग

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोगक्ता श्री.टी.ए.भणगे यांचेमार्फत शपथेवर सरू**

१. दि. २९/०८/२०२५ रोजी पोलीसांनी मला देवबाग येथे पंचनामा करण्यासाठी बोलविलेले होते. पोलीसांनी माझ्या समक्ष मुद्देमाल जप्त केला व पंचनामा तयार केला. त्यानंतर माझी त्यावर सही घेतली. साक्षीदारास दि. २९/०८/२०२५ रोजीचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अ.क्र. २ वर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास नि.क्र. पी१/पीडब्ल्यू१ देण्यता येते. आरोपीला दाखविण्यास मी ओळखू शकतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञा श्रीमती के.आर.झाड यांचेमार्फत**

२. हे म्हणणे खरे आहे की, मी देवबाग गावचा रहिवाशी नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी कथीत घटनास्थळाचा सर्व्हे नंबर हिस्सा नंबर सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी कथीत पंचनाम्यामध्ये नमूद असलेल्या घराचा क्रमांक सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला पचंनाम्यातील मजकूराबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावर पंचनाम्यासाठी गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांच्या सांगण्यावरुन पोलीस स्टेशन येथे सही केली. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांच्या बरेच केसीसमध्ये पंच म्हणून काम केलेले आहे. हे म्हणणे आहे की , माझे व पोलीसांचे संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझया समक्ष कोणताही मुद्देमाल जप्त करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांनी मजकूर सांगितला व पोलीसांनी तसे लिहून घेतले असे काही घडलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पुर्वीच लिहून ठेवलेल्या पंचनाम्यावर मी सही केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे.

उलट तपास पुर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

एम.के.फकीह
न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.

दि. ११-०२-२०२६